अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
**शासन निर्णय** :- क्र.टिइएम-२००७/(२६६/०७)/तांशि-१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३० जून, २००७ .

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे दिनांक २८ मे, २००७ चे पत्र क्र. ०६/०७/MS/PHAR/०६६

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालीलप्रमाणे संस्थेस शैक्षणिक वर्ष २००७-२००८ करिता औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचें नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | श्री सचिदानंद शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी मु. कोराडी, ता. कामेटी नागपूर | बी फार्मसी | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी ऑफ इंडिया , नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

६) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

७) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापिठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ नागपूर
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.